GR-20040729172401001-1100.

केंद्र शासनाच्या विद्युत अधिनियम २००३अन्वये केंद्र शासनाने व राज्य शासनाने पारपाडावयाच्या जबाबदा-या व राज्यशासनास सल्ला देण्याकरिता तज्ञ समितीची नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.इसीए २००३/प्र.क्र.८५७१/ऊर्जा-५
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:-२४सप्टेंबर,२००३.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाचा विद्युत अधिनियम २००३ दिनांक १० जून २००३ पासून अंमलात आला असून सदर अधिनियमानुसार केंद्र शासन व राज्य शासनाने पार पाडावयाच्या जबाबदा-यापैकी काही प्रमुख जबाबदा-या खालील प्रमाणे आहेत :-

१. अधिनियमाच्या कलम ३ नुसार, केंद्र शासनाने, राज्य शासन व केंद्रीय विद्युत प्राधिकरणाशी विचार विनिमय करुन राष्ट्रीय विद्युत धोरण व वीज दर धोरण तयार करावयाचे आहे. राष्ट्रीय विद्युत धोरणाच्या अनुषंगाने केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने राष्ट्रीय विद्युत योजना तयार करावयाची आहे. राष्ट्रीय विद्युत योजनेच्या मसुद्यावर वीज निर्मिती कंपन्या, परवानेधारक कंपन्या व जनतेकडून अभिप्राय मागविले जातील व केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर ती अधिसूचित केली जाईल.
२. अधिनियमाच्या कलम ४ नुसार, केंद्र शासनाने राज्य शासनाशी विचार विनिमय करुन ग्रामीण भागासाठी स्टँड अलोन सिस्टिम (वितरण विभागाशी संलग्न असणारी वीज निर्मिती कंपनी) बाबतचे धोरण तयार करावयाचे आहे.
३. अधिनियमाच्या कलम ६ नुसार, गावे व वाड्यांसहित सर्व भागाला वीज पुरवठा करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे.
४. अधिनियमाच्या कलम १४ च्या आठव्या परंतुकानुसार, राज्य शासनाने ग्रामीण भाग अधिसूचित करावयाचा आहे.

शासन निर्णय:-

वरीलपैकी अ.क्र.१ व २ येथील जबाबदा-यासंदर्भात केंद्र शासनाला वेळोवेळी अभिप्राय देण्यासाठी आणि अ.क्र.३ व ४ येथील जबाबदा-या पार पाडण्यासाठी, राज्य शासनास सल्ला देण्याकरिता , राज्य शासनाने एका तज्ञ समिती स्थापन करण्याचा आता निर्णय घेतला आहे. या समितीची रचना खालील प्रमाणे राहील :-

अ.क्र.	नाव	कार्यक्षेत्र	समितीवरील पदनाम
१	श्री.पी. अब्राहम	माजी केंद्रीय ऊर्जा सचिव व म.रा.वि.मंडळाचे माजी अध्यक्ष	अध्यक्ष

२	डॉ.अशोक हरणे	मुख्याधिकारी,आ[illegible]एस	सदस्य
३	श्री.अतुल किर्लोस्कर	उद्योजक, व्यवस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी..किर्लोस्कर कंपनी.	सदस्य
४.	शेतकरी ग्राहक प्रतिनिधी	श्री.शंकररावजी कोल्हे,विधानसभा सदस्य, मु.पो. [illegible] , ता.कोपरगाव , जि.अहमदनगर	सदस्य
५.	वीज ग्राहक प्रतिनिधी		सदस्य
६.	श्री.दळवी सी. एन.	मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर.	सदस्य
७.	तांत्रिक संचालक (वितरण),	म.रा.वि.मंडळ, प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.	सदस्य सचिव

समितीची कार्यकक्षा

१. या समितीची मुदत ६ महिने राहील. या समितीमध्ये वेळोवेळी आणखी सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल.

२. राष्ट्रीय विद्युत धोरण, वीज दर धोरण व राष्ट्रीय विद्युत योजना यावर केंद्र शासन / केंद्रीय विद्युत प्राधिकरणास अभिप्राय देण्यासाठी राज्य शासनाला सहाय करणे.

३. ग्रामीण भागासाठी केंद्र शासन तयार करणार असलेल्या स्टँड अलोन सिस्टिम बाबतच्या धोरणासंदर्भात राज्य शासनाचे अभिप्राय देण्यासाठी राज्य शासनाला सहाय करणे.

४. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६ नुसार देणारी जबाबदारी कशी पार पाडावी याबाबत शासनाला शिफारशी करणे.

५. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ च्या प्रयोजनार्थ ग्रामीण भाग अधिसूचित करण्यासंदर्भात राज्य शासनाला शिफारस करणे.

६. विद्युत अधिनियम २००३ च्या अमलबजावणीसंदर्भात शासनास आवश्यक भासणाऱ्या अन्य कोणत्याही बाबी बाबत शिफारशी करणे.

सदर समितीच्या बैठकांचे आयोजन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या हाँगकाँग बँकेतील कार्यालयात करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जयंत कावळे)

शासनाचे सचिव (ऊर्जा)

प्रति,

महालेखापाल-१,मुंबई.

महालेखापाल-२,नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी,अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई.